सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027
# ग्लोबल महातेज
https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192
वर्ष १ ले | अंक : २८१ | शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४४०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३१९००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११००००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३४०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे
अभीष्टचिंतन


श्री. विवेकानंद भांडारकर
अमळनेर

ॲड.यज्ञेश्वर पाटील
अमळनेर

## दिनविशेष
३ जुलै

- महात्मा फुले यांनी दलित मुलांसाठी पहिली शाळा उघडली.
- भारतात कायदे शिक्षणाचा प्रारंभ झाला.
- कवी प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.
- सुधीर फडके यांना राज्य सरकारचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाला भीषण आग
## कोट्यवधींचे नुकसान



## मदतकार्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन; देवांच्या मूर्ती सुरक्षित; आगीवर नियंत्रण
## संरचनेचे ऑडिट होईपर्यंत मंदिर बंद राहणार : प्रांताधिकारी मयूर भंगाळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संपूर्ण महाराष्ट्रातील प्रतिपंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या आणि दोनशेपेक्षा अधिक वर्षांची ऐतिहासिक, धार्मिक पार्श्वभूमी लाभलेल्या येथील संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानाची मुख्य इमारत असलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या वरच्या मजल्यावरील संत श्री प. पू. प्रसाद महाराज यांच्या बैठक खोलीतील सीसीटीव्ही यंत्रणेतील शॉर्टसर्किटमुळे बुधवार, दि. १ जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास भीषण आग लागली. मंदिराची एकूणच रचना संपूर्ण लाकडी असल्याने तिला दरवर्षी ऑइल पेंट केले जात असल्यामुळे आग क्षणार्धात रौद्र रूप धारण करत इतरत्रही पसरली.

यात सुमारे पाच ते सहा कोटींच्या मालमत्तेचे नुकसान झाले. मात्र, देवांच्या सर्व मूर्ती सुरक्षित राहिल्या. त्यामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. आगीत मंदिराच्या इमारतीचे सुमारे सहा लाखांवर किमतीचे नुकसान झाले असले, तरी मंदिरातील सर्व देवांच्या मूर्ती सुरक्षित राहिल्या. दरम्यान, मंदिराच्या संरचनेचे (स्ट्रक्चरल) ऑडिट पूर्ण होईपर्यंत सुरक्षेच्या कारणास्तव मंदिर काही दिवस भाविकांसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी दिली आहे.

आगीचे वृत्त कळताच अमळनेर पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, पारोळा पालिकेचे मुख्याधिकारी तुषार नेरकर, शिरपूर पालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत सरोदे, चोपड्याच्या नगराध्यक्षांचे पती तसेच अग्नीशमन विभागाचे गणेश गोसावी यांनी कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, फारूक शेख, जफर पठाण, सत्येन संदानशीव, आनंद झिंबल, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशीव, रफिक पठाण, आकाश संदानशीव, लखन कंखरे, आकाश बाविस्कर, अजय बिऱ्हाडे यांच्यासह अग्नीशमन बंब घटनास्थळी रवाना केले.

तसेच तेही स्वतः तेथे पोहोचले. परंतु बोरी नदीकाठच्या रस्त्यामुळे अग्नीशमन बंब तत्काळ घटनास्थळी पोहोचण्यात अडचणी आल्या. तरीही अग्नीशमन दल, खासगी टँकर आणि नागरिक, स्वयंसेवक तसेच पोलीस प्रशासनाच्या मदतीमुळे काही तासांनंतर आग आटोक्यात आली. दरम्यान, सकाळीच संत श्री प. पू. प्रसाद महाराज संत श्री सखाराम महाराजांची पारंपरिक दिंडी घेऊन वारकऱ्यांसमवेत पंढरपूरकडे रवाना झाले होते.

आमदार अनिलदादा पाटील यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी चोपडा, शिरपूर व पारोळा येथून अतिरिक्त अग्नीशमन वाहने पाठविण्याची विनंती केली. त्यावरून पारोळा येथून पालिकेचे अग्नीशमन बंब तातडीने दाखल झाले. तसेच आर. बी. कन्स्ट्रक्शनचे पाण्याचे टँकरही त्यांनी उपलब्ध करून दिले. तसेच अमळनेर शहरातील पत्रकार संघटनांनीही सोशल मीडियाच्या माध्यमातून खासगी टँकरमालकांना मदतीचे आवाहन केले.





**अधिकाऱ्यांची टीम तत्काळ दाखल**

प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, चोपडा नगरपरिषदेचे अभियंता डिंगबर वाघ हे घटनास्थळी दाखल होऊन परिस्थितीवर नियंत्रण ठेवत होते. उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते यांनी पोलीस ताफ्यासह गर्दी नियंत्रणात आणल्याने अग्नीशमन दलाला मदतकार्य करणे सुलभ झाले.

### सामाजिक ऐक्याचे दर्शन

आग नियंत्रण आणण्यासह संपूर्ण बचावकार्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले. विविध सामाजिक, राजकीय संघटनांचे पदाधिकारी, नगरसेवक तसेच विविध समाजांतील युवकांनी कोणताही भेदभाव न करता आग विझविण्यासह पाणीपुरवठा, गर्दी नियंत्रण आणि मंदिरातील साहित्य बाहेर काढण्याच्या कामात सक्रिय सहभाग नोंदविला. संकटसमयी समाजातील एकोप्याचे हे चित्र सर्वांचे लक्षवेधक ठरले.

### यांनी केले मदतकार्य

अमळनेर पालिकेच्या वतीने अनिल महाजन, पंकज चौधरी, बाळा संदानशीव, पंकज भोई, गोपी कासार, सूरज परदेशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, पत्रकार जितेंद्र ठाकूर, नितीन निळे, विजय पाटील, संजय कौतिक पाटील, महेंद्र पाटील, प्रताप साळी, देवेंद्र कांबळे, सुनील भोई, लक्ष्मण महाजन, नाना धनगर, केतन जोशी, शोएब शेख, अर्शद खान, हुजैफा पठाण, इम्रान पठाण, नईम पठाण, नसीब पठाण, राजा पठाण, फरहान शेख, आकिब पठाण आणि रिजवान खान यांच्यासह अनेकांनी मदतकार्य केले. याप्रसंगी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले.

## आगीत कोट्यवधींचे नुकसान; अनिकेत देव यांची पोलिसांत खबर

अमळनेर : येथील संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातील मंदिर गाभाऱ्यासमोरील सभा मंडपाला मंगळवार, दि. १ जुलै रोजी रात्री सुमारे ८ ते ८.१५ वाजेदरम्यान आग लागल्याची घटना घडली. यात सुमारे पाच ते सहा कोटी रुपयांचे सागवान लाकडाचे बांधकाम व इतर साहित्य खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याबाबत अनिकेत विकास देव (वय ४०, रा. वाडी चौक, अमळनेर) यांनी पोलिसांत खबर दिली आहे. त्यांच्या माहितीनुसार ते मंदिरासमोर उभे असताना सभा मंडपाच्या आतील बाजूने धूर निघत असल्याचे दिसले. त्यानंतर त्यांनी व इतर भाविकांनी घटनास्थळी धाव घेतली असता मंडपाला आग लागल्याचे निदर्शनास आले.

प्राथमिक माहितीनुसार मंडपातील इलेक्ट्रिक वायरिंगजवळ शॉर्टसर्किट होऊन खाली असलेल्या सतरंजीवर ठिणग्या पडल्याने आग लागल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आग वाढत असल्याचे लक्षात येताच अनिकेत देव यांच्यासह अतुल कुलकर्णी, कुणाल भावसार, अनिल जाधव, सूरजसिंग परदेशी, प्रमोद जाधव व इतरांनी पाण्याच्या सहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग आटोक्यात येत नसल्याने तातडीने अग्नीशमन दलाला माहिती देण्यात आली.

माहिती मिळताच अमळनेर अग्नीशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग आटोक्यात आणली. या घटनेत सभा मंडपातील मोठ्या प्रमाणात सागवान लाकडाचे बांधकाम व अन्य साहित्य खाक झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात आकस्मिक आगीची नोंद करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज पुढील तपास करीत आहेत.



"वाडी संस्थानातील आग ही अत्यंत वेदनादायी घटना म्हणता येईल. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे ही दुर्घटना घडली. मात्र, पांडुरंगाच्या कृपेने कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही दिलासादायक बाब आहे. वारी ही पांडुरंगाची सेवा असून, कोणत्याही परिस्थितीत ती थांबविणार नाही. यापूर्वीही आईंच्या निधनाची घटना घडली तेव्हाही वारी सोडली नाही. पांडुरंगांच्या भक्तीपुढे दुःख, आनंद आणि मोह-माया क्षुल्लक आहे. त्यामुळे सर्व वारकरी व भाविकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता, संयम आणि श्रद्धा राखावी. पालिकेचे अग्नीशमन बंब, पोलीस प्रशासन, सर्व शासकीय यंत्रणा, सामाजिक कार्यकर्ते तसेच हिंदू-मुस्लिम बांधवांनी जीवाची पर्वा न करता केलेले मदतकार्य कायम स्मरणात राहील. पांडुरंगांच्या कृपेने सर्व काही पुन्हा पूर्ववत उभे राहील.

**– संत श्री प. पू. प्रसाद महाराज**



"संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातील आगीची घटना अत्यंत वेदनादायक आहे. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाशी संपर्क साधून अतिरिक्त अग्नीशमन बंब, पाण्याचे टँकर व आवश्यक यंत्रणा तातडीने घटनास्थळी उपलब्ध करून देण्याची सूचना वजा विनंती चोपडा, शिरपूर व पारोळा येथील मुख्याधिकाऱ्यांना केली. त्यांनी ती तत्काळ मान्य केली. आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्नीशमन दल, पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, पालिका, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, स्वयंसेवक तसेच समाजातील सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांनी ऐक्याचे जे सुंदर दर्शन घडविले ते अमळनेरच्या सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे. संस्थानाच्या पुनर्बांधणीसाठी आणि भाविकांच्या सुविधांसाठी शासन स्तरावर आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील.

***– अनिलदादा पाटील, आमदार, अमळनेर.***

# मोफत पाठ्यपुस्तकांचे तालुक्यातील वितरण अपूर्ण
## इंग्रजीची पुस्तके, उर्वरित गणवेश पुढील आठवड्यात देणार : प्रभारी गटशिक्षणाधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही तालुक्यातील काही विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके अद्याप मिळालेली नाहीत. विशेषतः इयत्ता सहावीच्या इंग्रजी विषयाची पाठ्यपुस्तके अद्याप प्राप्त झालेली नसून, इतिहास विषयाचे काही संच अपूर्ण स्वरूपात आले आहेत. ही पुस्तके लवकरच उपलब्ध करून विद्यार्थ्यांना वितरित केली जातील, अशी माहिती प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील यांनी दिली.

मोफत गणवेश वितरणाचे कामही अंतिम टप्प्यात असून, एकूण ९ हजार २३१ लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी आतापर्यंत ४ हजार ८७२ विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित विद्यार्थ्यांना पुढील आठवड्यात संबंधित शाळा व्यवस्थापन समितीच्या स्तरावर गणवेश वितरित करण्यात येणार असल्याचे श्री. पाटील यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राज्य शासनाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांचे प्रशिक्षणही सुरू करण्यात आले आहे. इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीच्या शिक्षकांचे चार दिवसीय प्रशिक्षण प्रताप महाविद्यालयात सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सुरू असून, त्यामध्ये नवीन अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

इयत्ता सहावीच्या शिक्षकांचे प्रशिक्षण पुढील आठवड्यात आयोजित करण्यात येणार असून, उर्वरित राहिलेल्या शिक्षकांचे प्रशिक्षणही त्याच कालावधीत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती श्री. पाटील यांनी दिली. शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीलाच सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वेळेत मिळावेत, अशी पालकांची अपेक्षा आहे. उर्वरित पाठ्यपुस्तके आणि गणवेशाचे वितरण लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शिक्षण विभागाकडून आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

## संपादकीय

### उष्णतेची विषमता

हवामान बदल हा आता भविष्यकाळातील धोका राहिलेला नाही. तो वर्तमानातील कठोर वास्तव बनला आहे. या बदलाची झळ पृथ्वीवरील प्रत्येकाला बसत असली, तरी तिची तीव्रता सर्वांसाठी सारखी नाही. श्रीमंत आणि गरीब, शहर आणि गाव, वातानुकूलित कार्यालये आणि उन्हात राबणारी शेते यांच्यातील दरी जितकी आर्थिक आहे तितकीच ती हवामान बदलाच्या परिणामांमध्येही दिसून येते. निसर्गाचा प्रकोप सर्वांवर कोसळतो, पण त्याचा सर्वाधिक भार मात्र गरिबांच्या खांद्यावरच येऊन पडतो. भारतातील अनेक श्रीमंत कुटुंबे उन्हाळ्याच्या दिवसांत युरोपमध्ये सुटी घालविण्यास प्राधान्य देतात. तेथे थंड हवामानाचा आनंद घेण्याची त्यांची कल्पना असते. पण यंदा युरोपलाही उष्णतेच्या लाटेने अक्षरशः होरपळून काढले. फ्रान्समध्ये हजाराहून अधिक, तर संपूर्ण युरोपमध्ये सुमारे तेराशेहून अधिक लोकांचा उष्णतेमुळे मृत्यू झाला. ही आकडेवारी केवळ हवामान बदलाची तीव्रता सांगत नाही, तर निर्स आता कोणत्याही सीमा किंवा संपत्तीची तमा बाळगत नसल्याचे स्पष्ट करते. मात्र, युरोप आणि भारतातील परिस्थितीमध्ये एक मूलभूत फरक आहे. युरोपमध्ये भरदुपारी रस्त्यावर हातगाडी लावून उदरनिर्वाह करणारे, उन्हात बांधकामावर काम करणारे किंवा दिवसभर दुचाकीवरून घरपोच सेवा देणारे लाखो लोक नाहीत. भारतात मात्र कोट्यवधी लोकांसाठी उन्हात राबणे ही निवड नसून जगण्याची अपरिहार्यता आहे. त्यांच्यासाठी सूर्याची आग ही केवळ ऋतूची अनुभूती नसून रोजच्या पोटापाण्याची किंमत आहे. आपल्या देशातील सामाजिक आणि प्रशासकीय व्यवस्थेचे हे मोठे अपयश आहे, की उष्णतेच्या लाटेमुळे किती मजूर, शेतकरी किंवा असंघटित क्षेत्रातील कामगार मृत्युमुखी पडतात, याची विश्वासार्ह नोंदही आपल्याकडे उपलब्ध नसते. अनेक मृत्यू इतर कारणांच्या नावाखाली नोंदविले जातात. उष्माघात, निर्जलीकरण किंवा शरीरातील खनिजांच्या कमतरतेमुळए होणाऱ्या आजारांकडे गंभीरतेने पाहिले जात नाही. परिणामी, उष्णतेच्या संकटाची खरी व्याप्ती कधीच समोर येत नाही.

भारतीय शेतकरी हा हवामान बदलाचा सर्वांत मोठा बळी ठरत आहे. कडक उन्हात दिवसाचे अनेक तास शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याला विश्रांतीची सुविधा नसते. पाण्याची बाटली, सावली किंवा वैद्यकीय मदत ही अनेकदा त्याच्यासाठी चैनीची गोष्ट ठरते. शरीरातील पाणी कमी होणे, रक्तदाब बिघडणे किंवा उष्माघात होणे या समस्या वाढत असताना त्यांची साधी दखलही घेतली जात नाही. शेतकऱ्याचे आरोग्य हे शेतीइतकेच महत्त्वाचे आहे. ही जाणीव अजूनही धोरणकर्त्यांमध्ये पुरेशी निर्माण झालेली नाही. याहूनही गंभीर बाब म्हणजे सिंचनाची मर्यादित उपलब्धता. आजही देशातील केवळ सुमारे ४२ टक्के शेती सिंचनाखाली आहे. उर्वरित शेती पावसावर अवलंबून आहे. भूजल पातळी सातत्याने खालावत असल्याने बोअरवेल कोरड्या पडत आहेत. विहिरी आटत आहेत. शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचे संकट गडद होत असताना ग्रामीण भागातील परिस्थिती किती भीषण असेल, याची सहज कल्पना करता येते. पाण्याविना शेती करायची, की पिण्यासाठी पाणी राखायचे, हा प्रश्न अनेक गावांपुढे उभा राहिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार तापमान ४२ अंश सेल्सिअस असले तरी शरीराला जाणवणारी उष्णता ५० अंशांपर्यंत पोहोचत आहे. ही केवळ आकडेवारी नाही, ती मानवी सहनशक्तीची कसोटी आहे. शरीर आणि वातावरण यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस अधित तीव्र होत आहे. उष्णतेची ही अदृश्य तलवार सर्वाधिक गरीबांच्या आयुष्यावर चालते. आरोग्य व्यवस्थेची स्थितीही चिंताजनक आहे. अलीकडील सर्वेक्षणानुसार देशातील अर्ध्याहून अधिक नागरिकांना मृत्यूपूर्वी आवश्यक वैद्यकीय उपचार मिळत नाहीत.

अशा परिस्थितीत उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य संकटांना तोंड देणे आणखी कठीण ठरते. ग्रामीण आरोग्य केंद्रे, प्राथमिक उपचार सुविधा, उष्माघात प्रतिबंधक उपाययोजना आणि जनजागृती याकडे आता केवळ औपचारिकतेने नव्हे, तर राष्ट्रीय प्राधान्य म्हणून पाहण्याची गरज आहे. हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही. तो आता अन्नसुरक्षा, आरोग्य, रोजगार, अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय यांच्याशी जोडलेला आहे. त्यामुळे उपाययोजनाही बहुआयामी असाव्यात. जलसंधारण, वृक्षलागवड, सूक्ष्मसिंचन, हवामानस्नेही शेती, कामगारांसाठी उष्णतेपासून संरक्षणाची धोरणे, शहरांमध्ये हरित क्षेत्र वाढविणे आणि ग्रामीण भागात आरोग्य सुविधा मजबूत करणे, या सर्व गोष्टींची तातडीने अंमलबजावणी करावी लागेल. निसर्गाचा इशारा आता स्पष्ट आहे. पृथ्वी तापत आहे आणि त्यासोबत समाजातील विषमताही अधिक ठळक होत आहे. वातानुकूलित खोल्यांमधून हवामान बदलावर चर्चा करणाऱ्यांपेक्षा माणसालाही सुरक्षित जीवन देणारी व्यवस्था उभी करणे हा आहे. उष्णतेच्या या नव्या युगात सर्वांत मोठे आव्हान तापमानाचे नाही, तर विषमतेचे आहे. कारण सूर्य सर्वांवर सारखाच तळपत असला, तरी त्याची सर्वाधिक झळ अजूनही गावातल्या शेतकऱ्याला, मजुराला आणि गरीब कुटुंबालाच सहन करावी लागत आहे. हवामान बदलाशी लढताना ही विषमता कमी करण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही घटकांनी आता कृतीची दिशा स्वीकारली, तरच भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समतोल जग निर्माण करता येईल.

# अमळनेरात भल्या पहाटे पोलिसांकडून कोम्बिंग ऑपरेशन

## गुटखा, गावठी कट्टा, गावठी दारू, वॉन्टेड आरोपी पकडले; लाखोंचा माल जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात गुरुवार, दि. २ जुलै रोजी पहाटे साडेतीनपासून सकाळी सात वाजेपर्यंत पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबविले. त्यात गुटखा विक्री करणारे दोन, दारू भट्ट्यांवर कारवायांमधील सात, तर चोपडा शहरात गावठी कट्टा वापरणारे तीन जण अशा एकूण १२ आरोपींना अटक केली. त्यात लाखो रुपयांचा माल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, डीवायएसपी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, शरद काकळीज, भगवान शिरसाठ, कविताताई ठाणगे, 'एलसीबी'चे जितेंद्र वलटे यांच्यासह तीन आरसीबी पथके, अमळनेर डीबी व ५० कर्मचारी, उपविभागाचे ३० कर्मचारी व एलसीबीचे १२ कर्मचारी तसेच चोपडा कर्मचारी यांनी ही संयक्तिक कारवाई केली.

पोलिसांनी ११० गुन्हेगारांची घरे तपासली. त्यात त्यांना ७० गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आरोपी मिळून आले. त्यातील ५२ जणांची माहिती भरून त्यांना ताकीद देऊन सोडण्यात आले. न्यायालयात हजर नसलेल्या सहा जणांना अटक वॉरंट बजावून अटक करण्यात आली, तर १२ वॉन्टेड आरोपीना देखील अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे आकाश बाबूलाल सोनवणे (वय २०, रा. फरशी रोड) यांच्याकडे अंदाजे २० हजार रुपयांचा, तर सुगणामल किसनचंद बठेजा (वय ७५, सिंधी कॉलनी) यांच्याकडे सुमारे ६० हजार रुपयांचा गुटखा आढळून आला. त्याचप्रमाणे साने नगर, म्हाडा कॉलनी, पिळोदा, चांदणी कुऱ्हे, कंजरवाडा, पिंपळी, पैलाड आदी भागांत गावठी हातभट्ट्यांवर कारवाई करून सव्वालाख रुपयांची गावठी दारू तसेच रसायन जप्त करून ते नष्ट करण्यात आले. त्याचप्रमाणे चोपडा येथे गावठी कट्टा घेण्यासाठी संभाजीनगरकडील गाडी आली असल्याची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक नखाते यांनी एलसीबी व चोपडा पोलिसांना कारवाई करण्याचे आदेश देऊन गावठी कट्टा बाळगणाऱ्या ज्ञानेश्वर रामकृष्ण माळी (रा. कुऱ्हाड, ता पाचोरा), सचिन रोशन पवार, अनिल कचरे साळुंखे (रा. गंगापूर-संभाजीनगर) यांना ६० हजार रुपयांचा गावठी कट्टा, १० हजार रुपयांचे मॅगेझीन आणि ५ लाख रुपयांची कार (एमएच २०-ईई ६१०३) असा मुद्देमाल जप्त केला आहे.



*अमळनेर : पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात गुरुवार, दि. २ जुलै रोजी भल्या पहाटे राबविलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये विविध गुन्ह्यांत पकडलेल्या आरोपींसमवेत अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, डीवायएसपी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, शरद काकळीज, भगवान शिरसाठ, कविताताई ठाणगे, 'एलसीबी'चे जितेंद्र वलटे व पोलीस कर्मचारी.*

# 'महसूल'च्या ताब्यातील वाळूचे ट्रॅक्टर पळविले; गुन्हा दाखल

## तापी पात्रात कारवाईदरम्यान प्रकार; मारवड पोलिसांत फिर्याद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील नीम गावालगत तापी नदीपात्रात अवैध गौणखनिज (वाळू) उत्खननाविरोधात कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकाच्या ताब्यातील दोन ट्रॅक्टरचालकांनी महसूल अधिकाऱ्यांना चकवा देत भरधाव वेगाने ट्रॅक्टर पळवून नेल्याची धक्कादायक घटना रविवार, दि. २९ जून रोजी घडली. या प्रकरणी अज्ञात चालकांविरुद्ध मारवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

प्रांताधिकारी तथा तहसीलदार यांच्या तोंडी आदेशानुसार मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे पथक खासगी दुचाकींवरून नीम गावाजवळील तापीपात्रात गस्त घालत होते. त्यावेळी नदीपात्रात दोन विनाक्रमांक स्वराज कंपनीच्या ट्रॅक्टरमधून अवैधरित्या वाळू उत्खनन करून ती ट्रॉलीत भरली जात असल्याचे आढळून आले.

पथकाने चालकांना स्वतःची ओळख सांगून दोन्ही ट्रॅक्टर वाळूसह तहसील कार्यालयात आणण्यास सांगितले. मात्र चालकांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने महसूल अधिकाऱ्यांनी दोन्ही ट्रॅक्टर ताब्यात घेतले. यानंतर पोलीस मदतीसाठी तहसीलदारांना माहिती देण्यात आली. काही वेळात मारवड पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

ट्रॅक्टर नदीपात्रातून बाहेर काढण्यासाठी महसूल विभागातील दोन अधिकारी ट्रॅक्टरवर बसले होते. मात्र चढावावर ट्रॅक्टर न चढल्याने चालकांनी ट्रॉलीतील वाळू खाली करण्याची गरज असल्याचे सांगितले. अधिकारी खाली उतरताच वाळू खाली करत असताना त्याचे व्हिडिओ चित्रीकरण सुरू होते. याच संधीचा फायदा घेत एका ट्रॅक्टरने मांजसकाळ रस्त्याच्या दिशेने तर दुसऱ्याने कपिलेश्वर मंदिराच्या दिशेने भरधाव वेगाने पलायन केले.

महसूल पथकाने त्यांचा पाठलाग केला. मात्र, चालक अंधाधुंद वेगाने ट्रॅक्टर घेऊन पसार झाले. या प्रकरणी चालकांची नावे व पत्ते अज्ञात असून त्यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे व अवैध गौणखनिज वाहतुकीसह अन्य कलमान्वये मारवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ग्राईंडर मशीनच्या कटरने गळा कापला गेल्याने सुताराचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील टाकरखेडा येथे ग्राईंडर मशीन लावायला गेले असता ते हातातून निसटून गळा कापला गेल्याने सुताराचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि. २ जुलै रोजी दुपारी १२ वाजता घडली. देविदास लटकन सुतार (वय ७४) असे मृताचे नाव आहे.

देविदास सुतार हे फर्निचरचे तसेच मंदिराचे नक्षीकाम करत असत. नेहमीप्रमाणे ते आपल्या टाकरखेडा-जळगाव रस्त्यावरील पत्र्याच्या शेडमध्ये काम करीत होते. एका हातात ग्राईंडर मशीन पकडून ते बटन चालू करायला गेले असता त्यांच्या हातातून मशीन निसटून ते मानेच्या गळ्याच्या वर पडल्याने गळा कापला जाऊन खोल जखम झाली. त्यात मोठ्या प्रमाणात रक्तप्रवाह होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शेतरस्त्याच्या वादातून दाम्पत्यावर धारदार शस्त्राने हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शेतात रस्ता तयार करण्यावरून एका दाम्पत्याला लोखंडी धारदार शस्त्राने मारहाण केली. ही घटना मंगळार, दि. ३० जून रोजी सकाळी १० वाजता मंगरूळ येथे घडली.

भागवत धोंडू पाटील (रा. मंगरूळ, ता. अमळनेर. ह. मु. मुंडदानगर) हे त्यांच्या गट नंबर ४२/१ या शेतात दि. २८ जून रोजी रस्ता तयार करीत असताना नारायण युवराज पाटील व विजय युवराज पाटील तेथे आले. त्यांनी शेतरस्ता करण्यास विरोध केला व माझे वडील आता असते तर तुमचा कायमचा बंदोबस्त केला असता. आम्ही वडिलांना सांगून तुम्हाला ठार मारून तुमचा काटा काढू, अशी धमकी दिली होती. इतरांनी त्यांची समजूत काढून त्यांना परत पाठविले. दि. ३० जून रोजी त्यांचे वडील युवराज पाटील शेतात ट्रॅक्टरने काम सुरू असताना काम बंद पाडले आणि तुम्ही रस्ता कसा तयार केला. माझ्या मुलांनी तुमचा कायमचा काटा काढायचा सांगितले आहे, असे म्हणत शिवीगाळ सुरू केली. लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत खिशातून धारदार शस्त्र काढून भागवतच्या डोळ्यावर मारले. तसेच त्याची पत्नी भांडण आवरायला आली तर तिला देखील डाव्या हाताला शस्त्राने मारले. शेतात काम करणाऱ्यांनी त्यांना आवरले. भागवत जखमी झाल्याने त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथून डोळ्यांच्या दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर अमळनेर पोलीस ठाण्यात युवराज, नारायण आणि विजय यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे तपास करीत आहेत.

# 'या' देशात फोन, सायकल आणि लगेज लॉक न लावता ठेवतात, कारण रंजक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या कलियुगात तुमचे पाकीट आणि मोबाईल कधी प्रवासात लंपास होईल याची गॅरंटी नसते. लोकल ट्रेनच्या प्रवासात सतत आपले लक्ष पाकीट आणि मोबाईलच्या सुरक्षेकडे असते. अशा या घोर कलियुगात देवस्थानातील गर्दीत, मोठ्या सोहळ्यात, जेथे गर्दी जमते तेथे पाकीटमार हमखास हातसाफ करून जातात. मात्र, एक देश असा आहे ज्या देशात फोन, सायकल आणि बॅग आदी सामान लोक लॉक न लावता सोडून देतात. तरी त्यांची चोरी होत नाही. सोशल मीडियावर या देशाचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. युजर्स त्यावर अनेक कमेंट करत आहेत.

या एका व्यक्तीने सांगितले, की गेल्या एक महिन्यापासून पत्नी आणि मुलीसोबत ते दक्षिण कोरियात राहत आहेत. त्यांनी लिहिले आहे, की जर एखाद्या दुकानात वा रेस्टॉरंटमध्ये तुम्ही गेला तर बेबी स्ट्रोलर बाहेरच सोडून जातात. एकदा ते त्यांच्या मित्रासह एकत्र लंचला गेले तेव्हा मित्राने सायकलला टाळा न लावता तशीच सोडली आणि दोन तासांनंतर ते आले तेव्हा सायकल तिथल्या तिथे उभी होती. त्यांनी आणखी एका घटनेचा उल्लेख करताना सांगितले, की त्यांच्या एका मित्राचा आयफोन पार्कच्या बँच वर विसरून गेला होता. जेव्हा चार तासांनंतर ते तेथे पोहोचले तर त्यांचा फोन त्याच जागेवर सापडला. एवढेच नाही त्यांना एका के-पोप कॉन्सर्टच्या बाहेर अनेक लोकांच्या साहित्य कोणत्याही सुरक्षेशिवाय पडलेले आढळले. लोक त्यांचे लगेज मेट्रो स्टेशनच्या बाहेर सोडून आरामात कॉन्सर्टला गेले होते. जेव्हा त्यांनी स्थानिक लोकांना विचारले, की तुम्हाला चोरांची भीती वाटत नाही का तर त्यांना उत्तर मिळाले की अखेर कोणी कशाला या वस्तूंची चोरी करेल.




पोस्टमध्ये या व्यक्तीने लिहिले आहे, की दुसऱ्या देशात या स्थितीची कल्पना देखील करणे कठीण आहे. त्यांच्या मते दक्षिण कोरियासारख्या हाय ट्रस्ट समाजात कायदा आणि सामाजिक नियमांचे आदर केला जातो. तेथे छोट्या-मोठ्या चोरीला देखील गंभीरतेने घेतले जाते.

### युजर काय म्हणाले ?

सोशल मीडियावर या पोस्टवर अनेक लोकांनी निरनिराळ्या प्रतिक्रीया दिल्या आहेत. अनेक युजर्सने म्हटले आहे, की दक्षिण कोरियात प्रत्येक ठिकाणी बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे देखील लोकांना गुन्हा करण्यापासून रोखतात. तर काही लोकांनी म्हटले आहे, की अमेरिकेच्या काही छोट्या शहरात देखील लोक न घाबरता बिनधास्त साहित्य उघड्यावर ठेवून जातात.

एक युजर जो गेल्या १० वर्षांपासून दक्षिण कोरियात राहत आहे. त्यांनी लिहिले आहे, की तेथे सर्व काही परफेक्ट नाही. वर्क -लाईफ बॅलन्स आणि एअर क्वालिटीसारख्या समस्या देखील आहेत. मात्र, रात्री बाहेर फिरणे, दरवाजा लॉक करणे वा लॅपटॉप टेबलवर सोडल्यास कोणतेही टेन्शन नाही. हीच गोष्ट तेथे राहण्यास खास बनविते.

आता ही पोस्ट सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत. लोक यावर चर्चा करत आहेत की अखेर कोणा अन्य समाजात एका विश्वास ठेवता येऊ शकतो का? जेथे लोक त्यांचे साहित्य विना टाळ्याचे सोडून बिनधास्त सोडून देतात.

# वटपौर्णिमेनिमित्त अंबऋषी टेकडीवर आज वृक्षारोपण

## नागरिकांना सहभागाचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अंबऋषी टेकडी बहुउद्देशीय पर्यावरण ट्रस्ट, अमळनेर यांच्या वतीने वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ वाजता अंबऋषी टेकडीवर वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये नागरिकांनी आपल्या अर्धांगिनीसह सहभागी होऊन स्वतःच्या हस्ते वडाचे झाड लावावे, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

ट्रस्टचे सदस्य गेल्या २० वर्षांपासून पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. अंबऋषी टेकडी परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड, त्यांना नियमित पाणी देणे, खत टाकणे, चारी व खड्डे खोदणे आदी कामांमुळे आज या ठिकाणी सुंदर मानव निर्मित जंगल उभे राहिले आहे. या पर्यावरणपूरक उपक्रमात अधिकाधिक अमळनेरकरांनी सहभागी व्हावे, निसर्ग संवर्धनात आपले योगदान द्यावे आणि पर्यावरणाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करावो. सहभागी होणाऱ्यांना वडाची रोपे ट्रस्टतर्फे उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्या रोपांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारीही ट्रस्टकडून घेण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी इच्छुकांनी संपर्क साधून आपला सहभाग नोंदवावा.

# लायन्स क्लबतर्फे समाजसेवा, उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव

## डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट, प्रगतशील शेतकरी बांधवांचा समावेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लायन्स क्लबच्या वतीने नर्मदा फाऊंडेशनमध्ये आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात समाजसेवा, वैद्यकीय, आर्थिक आणि कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट आणि प्रगतशील शेतकरी बांधवांचा गौरव करण्यात आला.

क्लबचे अध्यक्ष जितेंद्र पारख अध्यक्षस्थानी होते. यावेळी सचिव जयेश गुजराथी, खजिनदार कुमारपाल कोठारी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना मान्यवरांनी समाजाप्रती निष्ठा, सेवाभाव आणि विविध क्षेत्रांतील योगदानामुळेच समाजाची प्रगती शक्य होत असल्याचे सांगितले. सन्मानित व्यक्तींचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून, हा सत्कार त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा छोटासा प्रयत्न असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. भविष्यातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांसाठी सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत राहील.

याप्रसंगी डॉ. संदीप जोशी, डॉ. मिलिंद नवसारीकर, डॉ. नरेंद्र महाजन, डॉ. किशोर शाह, डॉ. युसूफ पटेल, डॉ. बी. आर. बाविस्कर, डॉ. रवींद्र जैन, डॉ. निखिल बहुगुणे, सीए राजेश शाह, सीए अजय हिंदुजा, सीए रूपेश मकवाना तसेच शेतकरी एच. डी. भरुचा, सुशील जैन, योगेश मुंदडा, सुनील चौधरी, प्रीतेश पारख, जितेंद्र जैन आणि दिनेश मणियार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. किशोर शाह, अजय हिंदुजा आणि योगेश मुंदडा यांनी मनोगत व्यक्त करून समाजहितासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्ष पारख यांनी प्रास्ताविक केले. अजय हिंदुजा यांनी सूत्रसंचालन केले. सचिव जयेश गुजराथी यांनी आभार मानले.



*अमळनेर : येथील लायन्स क्लबच्या वतीने नर्मदा फाऊंडेशनमध्ये आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात उत्तम समाजसेवा, उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करताना अध्यक्ष जितेंद्र पारख, सचिव जयेश गुजराथी, खजिनदार कुमारपाल कोठारी.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# भाई की घड़ी ने वो सिखा दिया कि आयएएस बन गईं २४ साल की नेहा



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मेहनत, हौसला और परिवार का साथ हो तो असफलता भी सफलता की सीढ़ी बन सकती है। आयएएस नेहा ब्याडवाल की सक्सेस स्टोरी इसकी जीती-जागती मिसाल है। जिन्होंने यूपीएससी में लगातार तीन असफलताओं के बाद भी हार नहीं मानी। क्योंकि उस वक्त में पूरा परिवार उनके साथ खड़ा था। परिवार का सपोर्ट ही था जिसकी वजह से उन्हें न सिर्फ उस निराशा से निकलने में मदद मिली, बल्कि अपनी तैयारी जारी करने की हिम्मत भी मिली।

नेहा का जन्म राजस्थान के जयपुर में हुआ था, लेकिन उनकी परवरिश छत्तीसगढ़ और मध्य प्रदेश में हुई। उनके पिता श्रवण कुमार आयकर विभाग में थे। सरकारी नौकरी के दौरान उनका कई बार ट्रांसफर हुआ। इसी वजह से बार-बार स्कूल बदलना पड़ता था। जयपुर के बाद, छत्तीसगढ़ के जीपीएस बिलासपुर और फिर भोपाल के किड्स हाईस्कूल, डीपीएस कोरबा जैसे स्कूलों में पढ़ाई की। नई भाषा और नए माहौल में ढलने में समय लगता था। शायद यही वजह थी कि नेहा ५वीं क्लास में फेल भी हो गई थीं।
नेहा ने बार-बार स्कूल बदलने और ५वीं क्लास में फेल होने को अपनी मंजिल नहीं बनने दिया। उन्होंने रायपुर के डीबी गर्ल्स कॉलेज में एडमिशन लिया और यूनिवर्सिटी टॉपर बनीं। कॉलेज के बाद, पिता ने सिविल सर्विस में जाने के प्रेरित किया। कॉलेज की डिग्री लेने के बाद, आयएएस बनने के लिए यूपीएससी की सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू कर दी। हालांकि, आयएएस बनने का सफर आसान नहीं था।

**यूपीएससी में मिली लगातार तीन असफलताएं** यह वो वक्त था जब परिवार ने नेहा को टूटने नहीं दिया। उनका हौसला बनाए रखा और फिर से तैयारी करने के लिए मोटिवेट किया। एक इंटरव्यू में नेहा कहती हैं, 'कोशिश और गलतियों के साथ। कई मुश्किलें आईं, लेकिन फैमिली ने मुझे आगे ही बढ़ाया। मेरा मानना है कि मुश्किल समय में ही हमें खुद को समझने का मौका मिलता है।'

**यूपीएससी एस्पिरेंट्स को आयएएस नेहा की सलाह** देश के दूर-दराज इलाकों से सीएसई की तैयारी कर रहे यूपीएससी एस्पिरेंट्स को आईएएस नेहा सलाह देती हैं कि तैयारी के मामले में सबसे जरूरी बात यह है कि आप कितनी देर पढ़ते हैं और उस समय का कितना अच्छा इस्तेमाल करते हैं। आप कहां हैं, इससे कोई फर्क नहीं पड़ता, बस आपके पास एक अच्छा प्लान होना चाहिए। इस प्रोसेस से प्यार करना होगा और इसका आनंद लेना होगा।



## सोशल मीडिया से दूरी और भाई की घड़ी बनी टर्निंग पॉइंट

बार-बार असफलताओं के बाद उन्होंने सिर्फ खुद को बेहतर बनाने पर ध्यान दिया। करीब तीन साल के लिए सोशल मीडिया से दूरी बना ली। छोटे भाई की घड़ी ने प्रेशर में फोकस करना सिखाया। वे कहती हैं, 'मैंने अपनी कमजोरियों पर काम किया और अपनी खूबियों को और मजबूत किया। मेरा छोटा भाई मेरा पक्का साथी बना। उसने अपनी छोटी सी स्टॉपवॉच की मदद से मुझे दबाव में लिखने की चुनौती से निपटने में गाइड किया।' उन्होंने कहा, 'मैं किस्मत वाली थी कि मेरे आस-पास ऐसे लोग थे जिन्होंने पढ़ाई के लिए बेहतरीन माहौल बनाया। उन्होंने मेरा हौसला बढ़ाया, और मुझे कभी थकान या बोरियत महसूस नहीं हुई।'यूपीएससी रिजल्ट वाले दिन अंदर से रोई, २४ की उम्र में बनीं आयएएस. फिर वो दिन आया जब सबकुछ बदल गया। उन्होंने यूपीएससी सिविल सर्विसेज एग्जाम २०२१ में ५६९वीं ऑल इंडिया रैंक (यूपीएससी एआयआर) हासिल की और महज २४ साल की उम्र में गुजरात कैडर से आयएएस अफसर बनीं। रिजल्ट वाले दिन को याद करते हुए नेहा कहती हैं, 'फिर, २४ साल की उम्र में अपनी चौथी कोशिश में मुझे वह मिला जिसका मैंने सपना देखा था। नतीजे वाले दिन, मैं बाहर से कम और अंदर से ज्यादा रोई। बस अपने परिवार को देखा, उनकी आंखों में जो खुशी थी, वह मेरी सोच से कहीं ज्यादा थी। इस कामयाबी का एहसास अविश्वसनीय है।' आज आईएएस नेहा ब्याडवाल हरदोई की मुख्य विकास अधिकारी (सीडीओ) हैं।

# अठरा लाख वर्षांपूर्वीच मानवाने केला होता अग्नीचा वापर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाला कलाटणी देणारा एक महत्त्वपूर्ण शोध दक्षिण आफ्रिकेत लागला आहे. आफ्रिकेतील 'वंडरवर्क गुहेत' शास्त्रज्ञांना १८ लाख वर्षांपूर्वीचे जळालेले हाडांचे अवशेष सापडले आहेत. या शोधामुळे मानवाने अग्नीचा (आगीचा) वापर सुरू केल्याचा काळ आता थेट दुप्पट मागे गेला आहे. यापूर्वी मानवाद्वारे अग्नीच्या वापराचे सर्वांत जुने पुरावे सुमारे दहा लाख वर्षांपूर्वीचे मानले जात होते.

**'होमो इरेक्टस' आणि अग्नीचे नाते**

'प्लॉस वन' या प्रसिद्ध नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार हा पराक्रम आधुनिक मानवाचे (होमो सेपियन्स) पूर्वज असलेल्या 'होमो इरेक्टस्' या प्रजातीने केला होता. शास्त्रज्ञांच्या मते या आदिमानवांना स्वतःहून आग निर्माण करण्याची कला (उदा.- दगड घासून आग लावणे) अवगत नसावी. मात्र, जंगलातील नैसर्गिक वणव्यांपासून लागलेली आग त्यांनी गुहेत आणली असावी आणि ती सातत्याने पेटती ठेवली असावी.

**शोध लागला कसा?**

जेरुसलेमच्या हिब्रू युनिव्हर्सिटीच्या प्राध्यापिका लिओरा हॉर्विट्झ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासाठी एका नव्या आणि स्वस्त 'ल्युमिनेसेन्स' तंत्रज्ञानाचा वापर करून हे संशोधन केले. या पद्धतीत हाडांच्या तुकड्यांवर विशिष्ट रंगाचा निळा



प्रकाश टाकला जातो.

जळालेली हाडे या प्रकाशात चमकतात, तर न जळालेली हाडे अंधारात राहतात. गुहेत आढळलेले हे अवशेष घुबडांनी शिकार केलेल्या उंदरांचे आहेत. विशेष म्हणजे, हे जळालेले अवशेष गुहेच्या प्रवेशद्वारापासून तब्बल १०० फूट आत सापडले आहेत. एवढ्या खोलवर जंगलातील वणव्याची आग पोहोचणे अशक्य असल्याने, आदिमानवानेच ती जाणीवपूर्वक आत आणली असल्याच्या निष्कर्षाला बळकटी मिळते. पॅलिओअँथ्रोपोलॉजिस्ट मायकेल चाझान यांनी सांगितले, की 'आम्हाला अग्नीच्या अस्तित्वाचे अनेक पुरावे मिळत आहेत. आता प्रश्न असा आहे की ते या आगीचा वापर कशासाठी करत होते?'

काही शास्त्रज्ञांच्या मते आदिमानव गुहेतील सुकलेले पालापाचोळा किंवा प्राण्यांची विष्ठा ही आग पेटती ठेवण्यासाठी इंधन म्हणून वापरत असावेत. काही तज्ज्ञांनी यावर शंका उपस्थित केली असली, तरी हा शोध मानवी संस्कृतीच्या पायावर नवीन प्रकाश टाकणारा ठरला आहे.

# सकाळी रिकाम्यापोटी तुळशीचे पाणी प्या!

## अनेक आजारांपासून राहाल दूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रोगप्रतिकारक शक्ती**
तुळशीमध्ये मुबलक प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात. ज्यामुळे शरीराची विविध आजारपण आणि संसर्गाविरुद्ध लढण्याची क्षमता कमालीची मजबूत होते. मॉन्सूनमधील सर्दी-खोकल्यापासून यात असणारे अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-व्हायरल गुणधर्म बदलत्या ऋतूतील आजार, जुनाट सर्दी, खोकला आणि घशातील वेदनादायक खवखव दूर ठेवतात.

**पोटाचे आरोग्य**
दररोज सकाळी रिकाम्या पोटी तुळशीचे पाणी पिल्याने पोटातील आम्लपित्त कमी होते, बद्धकोष्ठतेचा त्रास मिटतो आणि चयापचय क्रिया नियंत्रित राहते.

**मानसिक तणाव वाढविणारे**
तुळशीच्या पाण्याचे नियमित सेवन शरीरातील तणाव निर्माण करणारे 'कॉर्टिसोल' हार्मोन नियंत्रित ठेवून मेंदूला आणि मनाला गाढ शांतता प्रदान करते.

**यकृताला पूर्णपणे स्वच्छ करणारे**
हे एक उत्कृष्ट नैसर्गिक डिटॉक्स पेय आहे, जे यकृतामधील सर्व विषारी कचरा बाहेर टाकून त्याची कार्यक्षमता दुप्पट वेगाने सुधारते.

**रक्तातील साखर आणि रक्तदाब**
तुळशीच्या पानांमधील नैसर्गिक गुणधर्म रक्तातील साखरेची पातळी आणि हाय ब्लडप्रेशर नियंत्रित ठेवतात. ज्यामुळे हृदयविकाराचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी होतो.

**श्वसनाचे विकार**
दररोज सकाळी या पाण्याचे सेवन केल्याने फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढून श्वसनाचे सर्व जुनाट विकार दूर राहतात आणि शरीर दिवसभर उत्साही राहते.






# केवळ मुखशुद्धी नव्हे! बडीशेपमध्ये दडलाय आरोग्याचा खजिना!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बडीशेपला केवळ मुखशुद्धीसाठीच नाही, तर उत्तम औषध म्हणूनही मानाचे स्थान आहे. आपल्या अप्रतिम मधुर स्वादामुळे आणि औषधी गुणांमुळे बडीशेपला संस्कृतमध्ये 'मधुरी' म्हटले जाते.

आचार्य चरक यांच्या मते बडीशेप गर्भ टिकवून ठेवण्यास (गर्भस्थापन) आणि पोटदुखीवर (शूलप्रशमन) अत्यंत गुणकारी आहे. आचार्य सुश्रुतांच्या मते शरीरातील वाढलेला कफ कमी करण्यासाठी (कफसंशमन) बडीशेप रामबाण उपाय आहे. युनानी वैद्य बडीशेपला पाचक मानतात; तसेच मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी ती प्रभावी ठरते. उष्णता, तोंडाची अरुची आणि भूक न लागणे या समस्या बडीशेपच्या सरबताने दूर होण्यास मदत होते. बाळंतिणीला बडीशेपचा काढा किंवा सरबत दिल्यास बाळाला उष्णतेचा त्रास होत नाही आणि अंगावरील दूध वाढते. युनानी चिकित्सेनुसार बडीशेपची पाने 'चक्षुष्य' म्हणजेच डोळ्यांची दृष्टी सुधारणारी मानली गेली आहेत. बडीशेप, ज्येष्ठमध, आवळा आणि खडीसाखरेचे मिश्रण पोट साफ होते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे






# देवींचे प्रकार, देवींना आवडणारी वाद्ये आणि त्यामागील आध्यात्मिक कारणे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवींच्या प्रकारांनुसार त्यांना कोणती वाद्ये आवडतात? त्यामागील आध्यात्मिक कारणे कोणती? याविषयी देवांच्या कृपेमुळे सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान पुढे दिले आहे.

**कनिष्ठ देवी :** काही देवी विशिष्ट क्षेत्राचे रक्षण करतात. त्यांना 'क्षेत्रदेवी' असे म्हणतात. काही देवी गावाचे रक्षण करतात. त्यांना 'ग्रामदेवी' किंवा 'कनिष्ठ देवी' असे म्हणतात.

**कनिष्ठ देवी कोणत्या आहेत? :** 'मंगला, सुमंगला, भद्रा, कल्पा, अंबा आणि वत्सा', या कनिष्ठ देवी आहेत. या देवींना 'यक्षिणीदेवी', असेही म्हणतात.

**यक्षिणींची माहिती :** यक्षिणींनी मागील स्त्री-जन्मात विशिष्ट देवतेची उपासना मनोभावे केलेली असते. मृत्यूनंतर त्यांना स्वर्गलोक प्राप्त होतो. स्वर्गलोकात वास करताना त्यांच्याकडून काही चुका किंवा पापकर्मे घडलेली असतात. त्यामुळे अशा स्त्रियांना पृथ्वीवर विशिष्ट ठिकाणी काही काळ राहून तेथील लोक किंवा नैसर्गिक संपत्ती (वने, जल इत्यादी) यांच्या रक्षणाची सेवा करण्याचा शाप मिळतो. त्या स्त्रियांच्या लिंगदेहांचा अर्धा भाग स्त्रीचा आणि अर्धा भाग देवीचा असतो. त्यांना देवीस्वरूप मानले आहे. त्यामुळे त्यांना 'यक्षिणीदेवी', असे म्हणतात.


**यक्षिणींचे कार्य :** जल आणि त्याजवळील परिसर, एखादे गाव, वनक्षेत्र, गावांच्या सीमा किंवा एखादे कुटुंब यांचे रक्षण करण्याचे कार्य यक्षिणीदेवी करतात.

**यक्षिणींची आवडती वाद्ये :** यक्षिणी रज-सत्त्वप्रधान असतात. त्यांना रजप्रधान ढोल, ताशा आणि नगारे ही वाद्ये प्रिय असतात. या वाद्यांना यक्षिणीदेवी स्वतः नृत्य करून किंवा हसून प्रतिसाद देतात.

**यक्षिणीदेवी आणि त्यांना आवडणारी वाद्ये यांचा परस्परांशी असलेला संबंध :** यक्षिणीदेवी पृथ्वीतत्त्वाशी निगडित असतात. 'ढोल, ताशा आणि नगारे' या वाद्यांतून पृथ्वीतत्त्वाशी संबंधित नादलहरी उत्पन्न होतात. त्यामुळे यक्षिणीदेवींना प्रसन्न करण्यासाठी ही वाद्ये पूरक असतात. त्यामुळे 'यक्षिणींना ढोल, ताशा आणि नगारे ही वाद्ये प्रिय असतात', असे म्हटले आहे.

**रज-तमप्रधान उग्रदेवी कोणत्या आहेत?**

काली, चामुंडा, भद्रकाली आणि श्री दुर्गादेवी या उग्र अन् रज-तमोगुणी रूपे असलेल्या देवींची आराधना वाईट शक्ती करतात. असुर श्री दुर्गादेवीच्या रज-तम रूपाची उपासना वाईट शक्तींच्या कार्यासाठी करतात आणि साधक श्री दुर्गादेवीच्या सत्त्वरूपाची उपासना स्वतःच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी करतात.



**उग्रदेवींची आवडती वाद्ये :** मोठ्या आकाराचे टाळ, उच्च नाद करण्याची क्षमता असलेला शंख, तुतारी आणि संबळ ही वाद्ये उग्रदेवींना प्रिय असतात.

**उग्रदेवी आणि त्यांना आवडणारी वाद्ये यांचा परस्परांशी असलेला संबंध :** उग्रदेवी आप आणि तेज या तत्त्वांशी संबंधित असतात. मोठ्या आकाराचे टाळ, उच्च नाद करण्याची क्षमता असलेला शंख, तुतारी आणि संबळ या वाद्यांतून आप अन् तेज या तत्त्वांशी संबंधित नादलहरी उत्पन्न होतात. त्यामुळे उग्रदेवींची उपासना करण्यासाठी ही वाद्ये पूरक असतात; म्हणून उग्रदेवींना मोठ्या आकाराचे टाळ, उच्च नाद करण्याची क्षमता असलेला शंख, तुतारी आणि संबळ ही वाद्ये प्रिय असतात, असे म्हटले आहे.

**सत्त्वप्रधान देवी कोणत्या आहेत?**

गायत्री, सरस्वती, लक्ष्मी, महालक्ष्मी, पार्वती आणि सात्त्विक रूपातील श्री दुर्गादेवी.

**सत्त्वप्रधान देवींची आवडती वाद्ये :** बासरी, वीणा, सतार, मंद आवाजातील टाळ, सनई आणि मृदंग ही वाद्ये सत्त्वप्रधान देवींना प्रिय असतात.

**सत्त्वप्रधान देवी आणि त्यांना आवडणारी वाद्ये यांचा परस्परांशी असलेला संबंध :** सत्त्वप्रधान देवी वायू आणि आकाश या तत्त्वांशी संबंधित असतात. बासरी, वीणा, सतार, मंद आवाजातील टाळ, सनई आणि मृदंग या वाद्यांतून वायू अन् आकाश या तत्त्वांशी संबंधित नादलहरी उत्पन्न होतात. त्यामुळे सत्त्वप्रधान देवींना प्रसन्न करण्यासाठी ही वाद्ये उपयोगी असतात; म्हणून सत्त्वप्रधान देवींना बासरी, वीणा, सतार, मंद आवाजातील टाळ, सनई आणि मृदंग ही वाद्ये प्रिय आहेत, असे म्हटले आहे.

# अन्नपूर्णा देवींचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अन्नपूर्णा या देवतेला एक अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. विशेषतः दत्त संप्रदायात जेव्हा भगवान दत्तात्रय यांना नैवेद्य दाखविला जातो त्यानंतर लगेच अन्नपूर्णा देवींनाही दाखविला जातो. त्यामुळे अन्नपूर्णा देवींना एवढे महत्त्व का दिले जाते? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. त्यासाठी अन्नपूर्णा देवींचे महत्त्व जाणून घ्यायला हवे.

भगवान शंकर आणि माता पार्वती यांची कथा प्रसिद्ध आहे. त्यामध्ये अन्नाचे एवढे महत्त्व भगवान शंकर यांनाही मान्य नव्हते. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला आणि माता पार्वती रुसून निघून गेल्या. माता पार्वती म्हणजे प्रत्यक्ष अन्नपूर्णाच. त्याच निघून गेल्यामुळे जगात सर्वत्र हाहाःकार माजला. अन्न नसल्यामुळे लोकांचे हाल सुरू झाले. शेवटी माता पार्वती यांनाच दया आली आणि त्या अन्नपूर्णेच्या स्वरूपात काशीला अवतीर्ण झाल्या. त्यांनी अन्नदान सुरू केले.

भगवान शंकर यांनाही मधली सगळी परिस्थिती अनुभवाला आल्यामुळे अन्नाचे महत्त्व समजले. ते स्वतः कटोरा घेऊन माता पार्वती यांच्याकडे भिक्षा मागायला आले. अन्नपूर्णा देवींचे पहिले मंदिर त्यामुळेच काशीला आहे.

जीवनात अन्नाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समस्त प्राणीमात्र अन्नाशिवाय जगू शकत नाहीत. अन्न शरीराला शक्ती पुरवते आणि जीवनाची नवी उमेद सतत देत राहते. अन्न खाल्ले की शरीराला एक प्रकारचे समाधान मिळते. म्हणूनच अन्नदानाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. ते अन्न सुग्रास असले पाहिजे. अन्न बनविणाऱ्याची मनःस्थिती समाधानी असली पाहिजे. त्यांनी ते अन्न समाधानाने बनविले असले पाहिजे. तेच पदार्थ घेऊन वेगवेगळ्या लोकांनी बनविलेल्या अन्नाची चव वेगवेगळी असते. याचे कारणच हे की अन्न बनविणाऱ्याच्या वासना आणि मनःस्थिती त्या अन्नात उतरत असते. म्हणून घरच्या अन्नपूर्णेला नेहमी समाधानात ठेवले गेले पाहिजे. तिने शुचिर्भूत होऊन अन्न शिजविले पाहिजे. आपल्याकडे मुलीला सासरी जाताना अन्नपूर्णा देवींची मूर्ती त्यासाठीच दिली जाते. तिने अन्नपूर्णेची सेवा, उपासना करून उत्तम अन्न कुटुंबीयांना खायला घालून कुटुंब सुखी करावे, अशी अपेक्षा त्यामागे असते. अन्नपूर्णा देवींची उपासना केल्यानंतर लक्षात येते, की नुसती उपासना उपयोगी नाही, तर त्यांची प्रत्यक्ष सेवा केली पाहिजे. म्हणून स्वतः वेगवेगळे पदार्थ बनविण्यास सुरूवात करायला पाहिजे.

आपल्या अनेक वासना या अन्नाद्वारे पूर्ण होत असतात. ज्यांच्या वासना अन्नात अडकून बसलेल्या असतात, खाण्याच्या अनेक इच्छा अपूर्ण असतात. जेथे शरीर आहे तेथे वासना असणारच. त्या पूर्ण झाल्याशिवाय संपत नाहीत. मित्रमंडळ जमा करून चिवड्याचा ढीगच्या ढीग फस्त करताना कसा आनंद मिळतो हे अनेकांनी अनुभवले असेल. शेवटी जीवन हे आनंद निर्मितीसाठीच आहे. छोट्या-छोट्या गोष्टीत सुद्धा खूप आनंद भरला आहे. परंतु आपल्याला त्याची कल्पनाच नसल्यामुळे तो आनंद आपण घेत नाही. अन्नामुळे शरीरात चैतन्य उत्पन्न होते. अगदी शरीर सोडल्यानंतर सुद्धा या चैतन्याची आवश्यकता लिंग देहाला असते. उत्तम अन्न हे शरीराला समाधान प्राप्त करून देते. शुचिर्भूत होऊन आनंदी वृत्तीने स्वयंपाक करण्याची आवश्यकता आहे आणि ते वातावरण घरातील सर्व लोकांनी निर्माण करून द्यावे. त्या अन्नात प्रेम असते म्हणूनच आईच्या हातचे अन्न आपल्याला सगळ्यात गोड वाटते.

केलेला स्वयंपाक हा आपण प्रत्यक्ष परमेश्वरासाठी करतो ही भावना करून जर केला तर तो अतिशय उत्तम होतो. म्हणूनच नैवेद्याचे अन्न हे अतिशय चविष्ट असते. उत्तम संसार करून सर्व प्रकारच्या वासना भोगून पूर्ण केल्या पाहिजेत. तेव्हाच माणूस परमेश्वर चिंतनाकडे वळू शकतो. असमाधानी माणूस ध्यानधारणा करू शकत नाही. आपले सर्व ऋषीमुनी हे विवाहित दाखविले आहेत. सर्व प्रकारचे भोग भोगून वासनाक्षय करूनच ते पूर्णत्वाला पोहोचले आहेत.

**म्हणूनच शंकराचार्य म्हणतात–**

अन्नपूर्णे सदापूर्णे
शंकरप्राण वल्लभे।
ज्ञान वैराग्य सिध्यर्थं
भिक्षांदैहि च पार्वती
।।





# अडीच हजार वर्षे जुने आहे भारतातील रुक्मिणी देवी मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रेम आणि पवित्रतेचे प्रतीक असलेल्या रुक्मिणी देवी या भगवान श्रीकृष्णांच्या पहिली पत्नी आहेत. त्यानंतर जांबवती आणि सत्यभामा आहेत. जरी त्या त्यांची पहिली पत्नी होती; परंतु त्यांचे नाव नेहमीच राधाशी जोडण्यात आलेले आहे. त्यामुळे भारतात राधाकृष्णाची अनेक मंदिरे आहेत. द्वारकेत रुक्मिणीदेवींचे एकमेव मंदिर आहे.

**मंदिर कुठे आहे?**

हे मंदिर द्वारका शहराच्या हद्दीबाहेर आहे आणि द्वारकाधीश मंदिरापासून सुमारे २ किलोमीटर अंतरावर आहे. हे एका लहान पाण्याच्या तलावाच्या शेजारी आहे. ज्याभोवती अनेक पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येतो आणि या ठिकाणी शांतता आहे. हे मंदिर बांधले तेव्हा ते जंगल असावे.

**मंदिर कसे आहे?**

मंदिरात खरोखर सुंदर आणि जुने कोरीवकाम केलेले आहे. त्यावर असलेले शिखर आहे. शिखरावर एका फलकावर सुंदर स्त्रियांची रचनाही आहे. या ठिकाणी विष्णूच्या काही प्रतिमा आहेत आणि पायावर एक उलटे कमळ आहे आणि त्यानंतर हत्तींच्या रचनांची रांग आहे. या विशिष्ट नागारा शैलीतील वास्तुशिल्प मंदिराच्या शिखरावर भगवा ध्वजही आहे.

रुक्मिणी हा लक्ष्मीचा अवतार आहे आणि त्याचप्रमाणे राधा देखील लक्ष्मीचा अवतार आहे. तसेच, दोघी कधीही एकत्र दिसल्या नाहीत. म्हणून अनेकांचा असा विश्वास आहे की दोन्ही एकच आहेत. त्यांचे समान वय आणि भगवान श्रीकृष्णावरील भक्ती लक्षात घेता हे देखील शक्य आहे.

# संपूर्ण कोकणात आषाढात भरते सातेरी देवींची यात्रा

## जाणून घ्या ७०० वर्षे जुन्या मंदिराचा इतिहास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील मसुरे गावाच्या बिळवस वाडीत वसलेले श्री सातेरी देवीचे जलमंदिर हे कोकणातील एक अद्वितीय आणि प्राचीन देवस्थान मानले जाते. मसुरे गावातील बारा वाड्यांची ग्रामदेवता असलेल्या सातेरी देवींचे हे मंदिर सुमारे ७०० वर्षे जुने असल्याचे सांगितले जाते. तिन्ही बाजूंनी पाण्याने वेढलेले असल्यामुळे या मंदिराला 'जलमंदिर' म्हणून ओळखले जाते आणि कोकणातील अशा प्रकारचे हे एकमेव मंदिर मानले जाते.

स्थानिक परंपरेनुसार एका जैन भक्ताने या मंदिराची उभारणी केली. मंदिर पूर्वाभिमुख असून त्यात प्रशस्त मंडप आणि सभामंडप आहे. पूर्वी गाभाऱ्यात मूर्ती नव्हती; तेथे असलेल्या उंच वारुळाची पूजा केली जात असे. या वारुळात देवी शेषरूपाने वास करते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. मंदिर परिसरातील विहीरवजा कुंड कधीही आटत नाही. या कुंडात भारतातील विविध पवित्र तीर्थक्षेत्रांतील नद्यांचे पाणी मिसळले असल्याची लोकश्रद्धा आहे. कुंडाच्या तळाशी महादेवाची पिंडही आहे.

यात्रेतील अनेक पारंपरिक विधी आजही जतन केले गेले आहेत. देवींसमोर ठेवलेले मडके मिरवणुकीने गांगोची राय येथे नेले जाते. नैवेद्याचा प्रसाद भक्तांमध्ये वाटला जातो. रात्री देवींचे अलंकार पेटाऱ्यात ठेवून मानकऱ्यांकडे नेले जातात. दुसऱ्या दिवशी धार्मिक विधींनंतर यात्रेची सांगता होते. मसुरे गावातील इतर देवकार्यांपूर्वी सातेरी देवींची ओटी भरण्याची परंपरा आजही पाळली जाते. दत्त मंदिर, म्हातारीची राई, गांगोची राई यांसारख्या अन्य देवस्थानांनी समृद्ध असलेल्या बिळवसचे हे जलमंदिर कोकणाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे एक महत्त्वपूर्ण प्रतीक आहे.

### काय आहे या देवींची आख्यायिका

मंदिराबाबत एक प्रसिद्ध आख्यायिका सांगितली जाते. पूर्वी तलावातील वारुळाजवळ जनावरे पाणी पिण्यास येत असत. एकदा त्या वारुळातून रक्त वाहू लागले. त्यानंतर एका ग्रामस्थाच्या स्वप्नात देवींनी दृष्टांत देऊन वारुळावर मंदिर बांधण्याची आज्ञा केली. ग्रामस्थांनी हा आदेश मानून या ठिकाणी देवालय उभारले. या मंदिराचा सर्वांत मोठा उत्सव आषाढ महिन्यात भरतो. संपूर्ण कोकणात आषाढ महिन्यात होणारी ही दुर्मिळ यात्रा मानली जाते. यावेळी गावातील चाकरमानी, माहेरवाशिणी आणि दूरवरचे भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या देवींना विशेष अलंकार चढवले जातात, मुखवटा धारण केला जातो आणि विविध धार्मिक विधी पार पडतात. प्रत्येक घरातून नैवेद्य आणला जातो आणि भक्तिभावाने गाऱ्हाणी घातली जातात.

# आश्चर्यच...'या' मुस्लिम देशात देवी दुर्गेचा महिमा?

## तब्बल तीनशे वर्षांपासून अखंड ज्योत, प्राचीन मंदिराबद्दल जाणून थक्क व्हाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात अनेक देवी-देवतांची पूजा केली जाते. प्रत्येक देवी-देवता विशिष्ट शक्ती आणि गुणांचे प्रतीक मानली जाते. भगवान ब्रह्मा हे सृष्टीचे निर्माते, भगवान विष्णू हे पालनकर्ते आणि भगवान शिवजी हे संहारकर्ते मानले जातात. तर देवींमध्ये देवी दुर्गा, महालक्ष्मी, सरस्वती, पार्वती आणि काली यांची विशेष पूजा केली जाते. तसे पाहायला गेले तर भारतात विविध ठिकाणी अनेक देवी-देवतांची मंदिरे आहेत. पण तुम्हाला हे जाणून कदाचित आश्चर्य वाटेल की तब्बल ९८ टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या एका देशात देवी दुर्गाला समर्पित एक प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर त्याच्या रहस्यमय अखंड ज्योतीसाठी आणि तीनशे वर्षांच्या इतिहासासाठी प्रसिद्ध आहे. जाणून घ्या.

**बहुसंख्य मुस्लिम असलेल्या देशात देवीचे मंदिर...एक आकर्षणाचा विषय...**

तब्बल ९८ टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या अझरबैजान या देशात एक असे मंदिर आहे, जे त्याच्या रहस्यमय अग्नीसाठी आणि अद्भुत इतिहासासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. माहितीनुसार हे मंदिर देवी दुर्गा आणि अग्नी पूजेशी संबंधित श्रद्धांमुळे विशेष मानले जाते. मुस्लिमबहुल देश (सुमारे ९८ टक्के) असूनही हे प्राचीन मंदिर लोकांना आश्चर्यचकित करते. या मंदिराला 'अग्नी मंदिर' म्हटले जाते. त्याचे मूळ नाव 'बाकू अतिश्गाह' आहे. येथे वर्षानुवर्षे तेवत असलेली अखंड ज्योत लोकांमध्ये एक प्रमुख आकर्षण ठरली आहे.

**सुमारे ३०० वर्ष जुनं मंदिर...**

मान्यतेनुसार हे मंदिर अझरबैजानची राजधानी बाकू जवळील सुराखानी परिसरात आहे. हे मंदिर सुमारे तीनशे वर्षे जुने असल्याचे मानले जाते. इतिहासकारांच्या मते प्राचीन काळी भारतातील व्यापारी आणि ऋषीमुनी या मंदिराला भेट देत असत. या लोकांनी या मंदिराच्या बांधकामात महत्त्वाची भूमिका बजावली. मंदिराच्या भिंतींवर संस्कृत आणि इतर भारतीय भाषांमध्ये लिहिलेले शिलालेख आजही पाहावयास मिळतात. यावरून येथील भारतीय संस्कृतीचा खोलवरचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. मंदिराची रचना देखील हिंदू मंदिरांसारखी आहे.



**सर्वांत लक्षवेधी गोष्ट–येथील अखंड ज्योत...**

इतिहासकारांच्या मते या मंदिराचे सर्वांत लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे येथील अखंड ज्योत. पूर्वी जमिनीखाली असलेल्या नैसर्गिक वायूमुळे ही ज्योत नैसर्गिकरित्या जळत असे. त्यामुळेच हे मंदिर 'अग्नीचे मंदिर' म्हणून ओळखले जाऊ लागले. असे म्हटले जाते, की १९६९ या वर्षापर्यंत ही ज्योत नैसर्गिकरित्या जळत होती. त्यानंतर वायूचा दाब कमी होऊ लागला. तेव्हापासून गॅस पाइपलाइनच्या मदतीने ही ज्योत सतत तेवत ठेवली जाते. हे रहस्य या ठिकाणाला आणखी विशेष बनवते.

**शिलालेखांमध्ये भगवान गणेश आणि अग्नीदेव यांचाही उल्लेख...**

अतिशगाह मंदिर आता एक संग्रहालय आणि ऐतिहासिक स्मारक म्हणून जतन केले आहे. येथे आता नियमित पूजा होत नाही, परंतु पर्यटक मोठ्या संख्येने येथे भेट देतात. मंदिर परिसरातील २६ खोल्या विविध धार्मिक परंपरांचे प्रतिबिंब दर्शवितात. शिलालेखांमध्ये भगवान गणेश आणि अग्नी देव यांचाही उल्लेख आहे, म्हणूनच हे स्थळ हिंदू आणि झोरोस्ट्रियन (पारशी) परंपरांच्या संगमाचे प्रतीक मानले जाते.

**जगभरातून हजारो लोक मंदिराला भेट देतात**

जगभरातून दरवर्षी हजारो लोक या मंदिराला भेट देतात, ज्यात भारतातील पर्यटक विशेष रस दाखवितात. बाकूमध्ये पोहोचल्यानंतर अतिशगाह मंदिरापर्यंत रस्त्याने सहज पोहोचता येते. या मंदिराला केवळ धार्मिक महत्त्वच नाही, तर ते त्याच्या इतिहास, संस्कृती आणि रहस्यमय अग्नीमुळेही लोकांना आकर्षित करते. यामुळेच अझरबैजानमधील हे अद्वितीय मंदिर जगभरात चर्चेचा विषय बनून राहिले आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)